॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

# Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

## जनसंपर्क विभाग

जळगाव. दि. १३ (     ) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या क्रीडा संकुलात सुरु झालेल्या पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ टेबल टेनिस (महिला) स्पर्धेचा पहिला दिवस महाराष्ट्रातील विद्यापीठांच्या महिला खेळाडूंनी गाजवला. महाराष्ट्रातील जळगाव, नागपूर, अमरावती, सोलापूर, नांदेड, कोल्हापूर येथील विद्यापीठांनी सायंकाळ पर्यंत साखळी पध्दतीच्या सामन्यात विजय प्राप्त केला. रात्री उशिरापर्यंत सामने सुरु होते.

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या वतीने मंगळवार, दि. १३ नोव्हेंबर पासून पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ टेबल टेनिस (महिला) स्पर्धांना विद्यापीठाच्या क्रीडा संकुलात प्रारंभ झाला. या स्पर्धेचे उद्‌घाटन कुलगुरु प्रा.पी.पी.पाटील यांच्या हस्ते झाले. यावेळी मंचावर प्र-कुलगुरु प्रा.पी.पी.माहुलीकर, व्यवस्थापन परिषद सदस्य दिलीप पाटील, प्रा.नितीन बारी, दीपक पाटील, कुलसचिव भ.भा.पाटील, प्रा.ए.बी.चौधरी, सिनेट सदस्य नितीन झाल्टे उपस्थित होते.

यावेळी बोलताना कुलगुरु प्रा.पाटील म्हणाले की, गेल्या काही वर्षात भारताच्या क्रीडा क्षेत्रात महिलांनी आपले वर्चस्व सिध्द केले आहे. यावर्षी आशियाई स्पर्धेच्या इतिहासात भारताने प्रथमच टेबल टेनिस स्पर्धेत दोन कास्य पदक प्राप्त केल्यामुळे टेबल टेनिस खेळाडूंचे मनोबल उंचावले आहे. हा खेळ चपळतेची परीक्षा पाहणारा आहे. प्रा.पी.पी.माहुलीकर यांनी आपल्या भाषणात मेडिकल, इंजिनियरींग व्यतिरिक्त पालक आता क्रीडा क्षेत्रात मुलांचे करिअर होऊ शकते यादृष्टीकोनातून पाहू लागले असल्यामुळे हा बदल स्वागतार्ह असल्याचे नमूद केले. स्पर्धेचे कार्याध्यक्ष दिलीप पाटील यांनी आयुष्यात निर्णय घेण्याची क्षमता खेळामुळे प्राप्त होते असे सांगून स्पर्धेत जय-पराजयापेक्षाही सहभाग महत्वाचा असल्याचे सांगितले. प्रारंभी क्रीडा संचालक डॉ.दिनेश पाटील यांनी प्रास्ताविक केले. सुत्रसंचालन प्रा.जी.ए.उस्मानी यांनी केले. सहायक क्रीडा संचालक आर.ए.पाटील यांनी आभार मानले. यावेळी पाहुण्यांनी टेबल टेनिस खेळून स्पर्धांना प्रारंभ केला.

**सायंकाळी पाच वाजेपर्यंत झालेल्या साखळी स्पर्धांचे निकाल पुढीलप्रमाणे:-**

कोर्ट नं.१ वर हेमचंद्रचार्य उत्तर गुजराथ विद्यापीठ विरुध्द राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर यांच्या झालेल्या सामन्यात राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर संघाने ३-१ ने विजय प्राप्त केला. महाराजा सयाजीराव विद्यापीठ, बडोदा विरुध्द गुजरात विद्यापीठ, कोटा यांच्यात झालेल्या सामन्यात बडोदा विद्यापीठाने ३-० ने विजय प्राप्त केला. गोविंद गुरु आदिवासी विद्यापीठ,बनसवारा (राजस्थान) विरुध्द राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर यांच्या चुरशीच्या झालेल्या सामन्यात नागपूर विद्यापीठाने ३-० विजय मिळविला. कोर्ट नं.२ वर झालेल्या सामन्यात कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव विरुध्द मोहनलाल सुखदिया विद्यापीठ, उदयपूर यांच्यात झालेल्या सामन्यात कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगावच्या संघाने उदयपूर संघाचा ३-१ ने पराभव केला. डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे विरुध्द वीरनर्मद साऊथ गुजरात विद्यापीठ, सुरत यांच्यात सुरत विद्यापीठाने ३-० ने विजय प्राप्त केला. कोर्ट नं.३ वर झालेल्या सामन्यात महाराजा कृष्णकुमारसिंहजी विद्यापीठ, भावनगर विरुध्द एल.एन.आय.पी.ई.ग्वाल्हेर यांच्यात झालेल्या सामन्यात ग्वाल्हेर संघाने भावनगर संघावर ३-० ने विजय प्राप्त केला. महाराजा छत्रसाल बुंदेलखंड विद्यापीठ, छत्रपूर विरुध्द सोलापूर विद्यापीठ, सोलापूर यांच्यात झालेल्या सामन्यात सोलापूर संघाने ३-० ने विजय मिळविला. संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती विरुध्द सरदार पटेल विद्यापीठ वल्लभविद्यानगर, गुजरात यांच्यात झालेल्या सामन्यात संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाने ३-० ने विजय प्राप्त केला. महाराष्ट्र पशू व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर विरुध्द मर्हषि दयानंद सरस्वती विद्यापीठ, अजमेर यांच्यात झालेल्या सामन्यात अजमेर विद्यापीठाने ३-० ने विजय मिळविला. कोर्ट नं. ४ वर झालेल्या सामन्यात स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड विरुध्द स्वामी रामानंद राजस्थान कृषी विद्यापीठ, बिकानेर यांच्यात झालेल्या सामन्यात नांदेड विद्यापीठाने ३-० ने विजय प्राप्त केला.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद विरुध्द सौराष्ट्र विद्यापीठ, राजकोट यांच्यात झालेल्या अटीतटीच्या सामन्यात राजकोट विद्यापीठाने ३-१ ने विजय मिळविला. बरकतुल्लाह विद्यापीठ, भोपाळ विरुध्द श्री.गोविंद गुरु विद्यापीठ, गोध्रा यांच्या झालेल्या सामन्यात भोपाळ विद्यापीठाने ३-० ने विजय प्राप्त केला. शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर विरुध्द कडी सर्व विद्यापीठ, गांधीनगर यांच्यात झालेल्या सामन्यात कोल्हापूर विद्यापीठाने एकतर्फी ३-० ने विजय प्राप्त केला.

या स्पर्धेच्या यशस्वीतेसाठी प्रा.एम.वाय.चव्हाण, डॉ.विजय पाटील, डॉ.पी.आर.चौधरी, डॉ.व्ही.के.पाटील, डॉ.संजय चौधरी, डॉ.प्रतिभा ढाके, प्रा.विकास महाजन, डॉ.तेजस शर्मा, डॉ.बी.आर.मोरे, डॉ.भारत चालसे, डॉ.अनिता कोल्हे, प्रा.किशोर वाघ, प्रा.हसीन तडवी, प्रा.क्रांती क्षीरसागर आदी परिश्रम घेत आहेत.

---

जा.क्र. : कबचौउमवि/16/हस्तदेय /2018 दिनांक : 13 नोव्हेंबर, 2018

प्रति,

**मा. संपादक / प्रतिनिधी,**

कृपया, उपरोक्त बातमी आपल्या दैनिकातून प्रसिध्द करण्यात यावी, ही विनंती.

आपला विश्वासू,

स्वाक्षरीत प्रत/-

(डॉ.सुनील पाटील)

जनसंपर्क अधिकारी